# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## शहर विकास विभाग,
## जाहीर सुचना

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये )**

**क्र. ठामपा/शविवि/वियोअंक/** २७६२ **दिनांक :** ०६/०३/२०१९

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस/१२९७/१३१९/सी. आर-१४८/९७/नवि-१२, दि. ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion) शासन निर्णय क्र. टिपीएस / १२०१/ २७४/ सीआर-२८/२००९/नवि-१२, दि. ३ एप्रिल, २००३ अन्वये मंजूर झाली असून दि. १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे. (यापूढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे.)

आणि ज्याअर्थी, ठाणे महापालिका क्षेत्रात अंतर्गत जलद वाहतुकीकरिता ठाणे शहराच्या मंजूर सुधारीत विकास योजनेमध्ये हाय कॅप्यासिटी मास ट्रान्सपोर्ट करीता (एच.सी.एम.टी.आर) आखणी, स्टेशन व कारशेड दर्शविण्यात आलेले आहे. सदर एच.सी.एम.टी.आर मार्गातील आखणी ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील मुलुंड येथील हरीओम नगर संकुलातून जात असून, सदर परिसर विकसीत झालेला असल्याने सदरच्या आखणीमध्ये बदल करणे तसेच शासनाने दि.२५/०२/२०१६ चे पत्रान्वये ठाणे महानगरपालिकेस दिलेल्या निर्देशानुसार HCMTR च्या आखणीमधील ESIS हॉस्पीटल मागील ते पोखरण रोड नं. १ या मार्गातील आखणी ऐवजी कोपरी (मनोरुग्णालय) ते तीन हात नाका ॲपलॅब सर्कल वरुन वागळे इस्टेट मेन रोड ते रस्ता क्र. १६ व्दारा रस्ता क्र. २२ ते मुळ मंजुरीतील रायफल रेंज / पोखरण रोड नं. १ या प्रमाणे आखणीत फेरबदल करणेसाठी मा. महासभेने दिलेल्या मंजूरीनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे दि.०१/०२/२०१८ अन्वये अंतिम मान्यतेसाठी सादर केलेला आहे. सदरच्या फेरबदलास अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही. तसेच मौजे माजिवडे येथील स. नं. ३८६पै. या जमिनीमधून जात असलेल्या ४५ मी. रुंद विकास योजना रस्ता व ३० मी. रुद HCMTR ची आखणी बदलणे बाबतच्या फेरबदलाच्या प्रस्तावास दि. २३/०१/२०१९ अन्वये शासनाची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता अंतर्गत मेट्रोचासविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेला असून, त्यास ठाणे महानगरपालिकेची मान्यता मिळालेली आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार एच.सी.एम.टी.आर. मार्गापलीकडे कासारवडवली पर्यंतच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजेचा विचार करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे शहरातील अंतर्गत वाहतुकीमध्ये सुधारणा करणेच्या अनुषंगाने अंतर्गत मेट्रो प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर अंतर्गत मेट्रो प्रकल्पाचा मार्ग प्रामुख्याने अस्तित्वातील रस्ते तसेच मंजूर विकास आराखडयातील रस्ते व एच.सी.एम.टी.आर. आखणी यावरुन प्रस्तावित केलेला आहे. मंजूर विकास योजनेतील एच.सी.एम.टी.आर.च्या आखणीमध्ये उपरोक्त परिच्छेदात नमूद फेरबदलांसह ठाणे स्थानक परिसर ते मेंटल हॉस्पिटल (मनोरुग्णालय) पर्यंत तसेच नव्याने विकसित झालेल्या घोडबंदर भागाचा अंतर्भाव करुन सदर सुधारित आखणी एच.सी.एम.टी.आर. / अंतर्गत मेट्रो म्हणून प्रस्तावित करुन त्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर सुधारित आखणीस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेस मा. महासभा ठराव क्र. ३९९, दि. २०/१०/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. (यापुढे " उक्त फेरबदल" असे संबोधिले आहे.)

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतूदीनुसार "उक्त मंजुर विकास योजनेत उक्त फेरबदलाबाबत" आम जनतेच्या सुचना / हरकती मागविणेसाठी ही जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक नगर रचना, ठाणे महानगरपालिका, डॉ. अल्मेडा रोड, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सुचना फलकावर तसेच खाली नमूद संकेत स्थळावर ठेवण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सुचना / हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी हि सुचना वृत्तपत्रात व www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर आणि महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसांचे आत आपली सुचना / हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे सादर करावी.

(श्रीकांत मा. देशमुख)
सहायक संचालक नगर रचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे, दिनांक : ०६/०३/ २०१९

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE
ठाणे महानगर पालिका